स्थायी समितीच्या **सोमवार** दिनांक 23–09–2013 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | सभापती |
| 2. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 3. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 4. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 5. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 6. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 7. | सौ.विषया विकास खोब्रागडे | सदस्या |
| 8. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 9. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 10. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 11. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 12. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |
| 13. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |
| 14. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |
| 2. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

सभापती :— आजच्या सभेत निगम सचिवांनी अधिका—यांच्या उपस्थितीच्या संदर्भात माहिती सादर करावी. तसेच जे अधिकारी मागच्या सभेत अनुपस्थित होते त्यांच्या संदर्भात प्रशासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यांत आली आहे, त्याचबरोबर एक माहिती सांगु इच्छितो कि, आपल्याकडे होतवाणी साहेबांच्या जागेवर धकाते साहेब आलेले आहे.

निगम सचिव :— मा.सभापती महोदय, आजच्या सभेला विकासयंत्री, (कार्यकारी अभियंता, पेंच प्रकल्प, हे सांगुन गेले आहे) अतिक्रमण अधिक्षक, स्थानिक लेखा परीक्षक, विशेष कार्यासन अधिकारी, मलेरीया/फायलेरीया अधिकारी अनुपस्थित आहेत.

सभापती :— मागच्या बैठकीमध्ये जे अधिकारी हजर नव्हते, त्यांच्या विरोधात शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यांत आली होती त्या संदर्भात काय कार्यवाही करण्यात आली.

निगम सचिव :— प्रस्ताव तयार करून मा.आयुक्तांकडे पाठविण्यांत आला आहे.

सभापती :— याचा कार्यवृत्त अहवाल स्थायी समितीच्या पुढच्या सभेत ठेवण्यांत यावा.

**ठराव क्रमांक 119** :— प्रभाग 27 चांडक ले आउट येथे सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रु 3612560/— च्या निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये **मे.आर.बी.केवलरामानी** यांना मुदतीत कार्यादेश न मिळाल्याने काम करण्यास नकार दिला, करिता निविदाकार **मे. अमित कन्स्ट्रक्शन** हयांनी प्रथम निविदाकाराच्या दरावर काम करण्यास स्विकृत दर्शविली आहे. करीता मे. अमित कन्स्ट्रक्शन यांना कार्यादेश देण्याची अनुमती प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 120</u> :— महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.गवसु 1220/प्र.क्र.204(1)/झोपसु—1, दि. 12 जुलै 2001 नुसार नागपूर शहरातील झोपडपट्टीवासीयांना म.न.पा.च्या सक्षम प्राधिकरणाव्दारा ओळखपत्र (फोटोपास) जारी करण्याचे काम करण्याकरिता रु. 28,00,000/— खर्चाच्या सुधारीत प्रस्तावास मान्यता प्रदान करणे व या कामाकरिता ई.ओ.आय.(अभिरुची प्रकटन ) मागवुन एजेन्सीज नियुक्त करणे तसेच या कामाकरिता पद क्र.337 '' झोपडपट्टीवासीयांना फोटोपास वाटप करणे'' या अंतर्गत रु.28,00,000/— चे आवश्यक प्रावधान उपलब्ध करण्यास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदा काढण्यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते, तसेच या कामाकरीता लागणाऱ्या आर्थिक तरतुदी करीता कार्यालयाने प्रधान शिर्षातील दिलेल्या पदा अंतर्गत पुर्नर्विनीयोजन चा प्रस्ताव पुढील स्थायी समितीच्या सभेमध्ये मंजूरी करीता सादर करावा यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 121</u> :— प्रभाग क्र. 41 येथे गांधी कन्या म.न.पा. शाळेच्या जागेवर स्पोर्टस् कॉम्प्लेक्सचे बांधकामास्तव द्वितीय निम्नतम निविदाकार मे. सी.विजय नायडू यांनी प्रथम निम्नतम निविदाकार यांचे मंजुर दरावर प्राकलनीय दरापेक्षा 4.07 टक्के कमी रु. 1,46,83,577/— दरावर काम करण्यास सहमती दिल्यांने, निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 122</u> :— स्थायी समिती ठराव क्र.50 दि. 28.05.2012 अन्वये नागपूर शहरातील शहर बस मार्गावर ग्रुप—6 ते ग्रुप—10 अंतर्गत असलेले एकुण 197 बस स्टॉप उभारणे व सुस्थितीत ठेवण्याचे काम बांधा, वापरा अणि हस्तांतरीत करा या तत्वावर 10 वर्षाकरीता Advertisement Rights वर देण्याकरीता ची ई— निविदा फिझीबिलीटी रिपोर्ट सादर करण्याकरीता परत पाठविल्यामुळे विभागाने NMPL यांचे मदतीने तयार केलेल्या फिझीबिलीटी रिपोर्टचे नुसार नविन बस शेल्टरच्या समावेश करुन तसेच ग्रुप—1 ते ग्रुप—5 शी तुलना करुन सुधारीत रायल्टी रक्कम रुपये 13,67,600.00 प्रती वर्ष प्रमाणे आकारुन ई—निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

तसेच बस शेल्टरचे पुर्वीचे 153 चे ठिकाण नवीन फिझीबिलीटी रिपोर्ट नुसार ठिकाणाचे बदलास व उरलेले 44 बस शेल्टर करीता ठिकाण निश्चित करण्याचे अधिकार अप्पर आयुक्त यांना प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन ई निविदा "मे. ग्रीन थंब इन्नोवेटर प्रा. ली." यांचे नावे मंजूर करण्याच्या प्रशासनाच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 123</u> :— प्रभाग क्र. 39 अ,ब महात्मा गांधी येथील ढीवरपुरा भागातील म.न.पा.शाळे जवळील नाला आर.सी.सी. बॉक्स सेलचे बांधकामास्तव प्राप्त 13 निविदांपैकी गुरुदयाल विठ्ठलराव राऊत, यांची प्राकलनीय दरांपेक्षा 24.51 प्रतिशत कमी दरांची रु.33,97,042/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री बंडु तळवेकर :— मा.सभापती महोदय, कुठल्याही विकास कामाची निविदा प्राकलनीय दरापेक्षा कमी असली तरी प्रशासनाव्दारे ठेकेदारांना अतिरिक्त सुरक्षा ठेव मागीतली आहे, हे कोणत्या नियमाप्रमाणे आहे.

अपर आयुक्त :— मा.सभापती महोदय, मागच्या स्थायी समितीमध्ये हा निर्णय झाला होता त्या निर्णयानुसार त्याची अंमलबजावणी करण्यांत आली आहे.

श्री बंडु तळवेकर :— मा.सभापती महोदय, प्रशासनाव्दारे कोण—कोणत्या कामाचे कार्यादेश देण्यांत आलेले आहे, ते काम आजपर्यंत पुर्ण झालेले आहे किंवा नाही, कार्यालयानी 120 दिवसाच्या मुदतीच्या आंत कार्यादेश द्यावयास पाहिजे होते, 120 दिवस पुर्ण होवु दिले, आता तो ठेकेदार काम करण्यास तयार नाही, जे काम करण्यास तयार आहे, त्यांचे म्हणणे असे आहे कि मी दोन टक्के वाढीव पैसे देवु शकत नाही माझ्या रनिंग बिलामधुन ही कपात करण्यांत यावी, याकडे प्रशासनानी लक्ष देण्याची गरज आहे, यावर धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे.

सभापती :— पी.डब्लु.डी. मेन्युअल प्रमाणे अतिरिक्त सुरक्षा ठेव मागण्यांत आली आहे, यावर ठेकेदारांचे म्हणणे आहे कि आमच्या रनिंग बिलामधुन ही वाढीव कपात करण्यांत यावी, या संदर्भात कॅफोने मत द्यावे.

कॅफो :— मा.सभापती महोदय, ठेकेदारांच्या रनिंग बिलामधुन कपात करण्याचा प्रस्ताव पाठविला आहे, त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता हे करतील त्याप्रमाणे पुढच्या बिलामधुन कपात करून बिल बनविण्यांत येईल.

नगरयंत्री :– मा.सभापती महोदय, मागच्या स्थायी समितीमध्ये हा विषय आला होता, त्यावेळी ब–याचश्या कॉन्ट्रक्टरनी असमर्थता व्यक्त केली होती, त्यानंतर असा प्रस्ताव तयार केला कि ही रक्कम त्यांच्या बिलामधुन कपात करू.

श्री बंडु तळवेकर :– मा.सभापती महोदय, नेरळ साहेबांकडे ती फाईल आहे, कार्यकारी अभियंतानी फाईलमध्ये तशी तरतुद केली आहे काय ? त्यांनी फाईल थांबविली आहे काय ? किती ठेकेदारांना आपण सुट दिली आहे.

अपर आयुक्त :– विभागानी हे चेक करून घ्यावे, या संदर्भात संबंधितांशी चर्चा केली जाईल.

श्री प्रशांत चोपडा :– मा.सभापती महोदय, इस संदर्भ मे युनिफार्म का एक नियम बनवालो.

सभापती :– याबाबत कार्यालयानी सर्कुलर काढले तर बरे होईल.

अपर आयुक्त :– सर्व कार्यकारी अभियंता येथे उपस्थित आहे त्यांनी याची नोंद घ्यावी.

श्री बंडु तळवेकर :– मा.सभापती महोदय, वर्क आर्डर झालेले काम केव्हा सुरू होईल, ज्या ठेकेदारांनी वर्क आर्डर घेवुन काम सुरू केले नाही, त्यांच्या संदर्भात कार्यालयाचे काय म्हणणे आहे, गायकवाड साहेबांना ते काम माहित आहे.

सभापती :– या अगोदर या विषयावर स्थायी समितीनी वारंवार निर्देश दिले आहे, जे ठेकेदार कार्यादेश घेवुन काम करीत नाही, कोणत्या ठेकेदारांकडे कोणते काम आहे, हे मा.सदस्यांना कसे माहित होणार आहे, ही कार्यालयाची जबाबदारी आहे, मा. सदस्यांची जबाबदारी नाही. जनप्रतिनिधी हे प्रशासन व जनतेचा दुवा आहे, इज नॉट अे वर्कर हे कार्यालयाचे काम आहे, आम्ही समस्या मांडण्यासाठी याठिकाणी बसलो असतो, कार्यालयानी सर्व माहिती अपडेट ठेवली पाहिजे, जे ठेकेदार वर्कआर्डर दिल्यानंतर सुध्दा काम करीत नाही, त्यांना कार्यालयानी नोटीस इशु करावे.

श्री बंडु तळवेकर :– मा.सभापती महोदय, स्थायी समितीकडुन पत्र गेलेले आहे, आज एक महिना पुर्ण झाला तरी आशीनगर झोनच्या कनिष्ठ अभियंतानी फाईल तयार केलेली नाही, मी याच्या अगोदर झोनशी पत्र व्यवहार केला आहे, नस्ती तयार करावी म्हणुन वारंवार कार्यालयाला सूचित केले आहे, स्थायी समिती त्या कामाकरिता प्रावधान देणार आहे, नस्ती वेळेवर तयार झाली नाही तर विकास कामे कसे होतील.

सहा.आयुक्त (आशीनगर झोन) :– मा.सभापती महोदय, मा.सदस्य, श्री बंडु तळवेकर यांच्या प्रभागाच्या तीन फाईल संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी तयार केल्या आहेत.

सभापती :– 572–1900 लेआउटच्या संदर्भात परिपत्रक काढण्यांत आले होते, त्याचे वाचन कॅफो यांनी याठिकाणी करावे.

कॅफो :– (परिपत्रक वाचले)

सभापती :– परिपत्रक काढतांना काय अपेक्षित होते.

कॅफो :– मा.सभापती महोदय, 1900–572 हे जे लेआउट आहे, ते लेआउट देखभाल व विकास कामासाठी महानगरपालिकेला हस्तांतरीत केले आहे, नागपूर परिक्षेत्रामध्ये दोन ॲथारीटी असल्यामुळे एन.आय.टी. मुलभुत सुविधेकरिता विकास शुल्काची रक्कम नागरिकांकडुन गोळा करते, त्यांनी असा अविकसित भाग म.न.पा.ला

हस्तांतरीत केला त्यासाठी त्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पामध्ये तरतुद सुध्दा केलेली आहे. याच्या बाबतीत आपण ठराव घेतला आहे, या अभिन्यास जे आपल्याकडे हस्तांतरीत झालेले आहे त्याठिकाणी अर्जंसी असेल तर काम आपण करू.

सभापती :— महाराष्ट्र शासनाच्या जी.आर.मध्ये एन.आय.टी.च्या लेआउटमध्ये काम का करू नये याचे स्पष्टीकरण दिले होते, त्यात असे म्हटले आहे कि तेच काम एन. आय.टी., म.न.पा. व पी.डब्लु.डी सुध्दा करते त्यामुळे एकाच कामावर विविध एजंसीचा खर्च एकसारखा होतो त्यामुळे एकच एजंसी फिक्स करून काम करावे, डेव्हलपमेंट चार्जेस नागरिकांकडुन एन.आय.टी. घेते म्हणुन त्यांनी त्याठिकाणी विकास कामे करावी असा त्याचा अर्थ होतो. त्या जी.आर.चा असा अर्थ होत नाही कि अमुक एजंसीने त्याठिकाणी काम करू नये, आपण त्याठिकाणी काम करू शकतो.

कफॅा :— मा.सभापती महोदय, आपण हे म्हटले कि, हे भाग आमच्याकडे देखभालीसाठी हस्तांतरीत केलेले नाही, हे एन.आय.टी.च्या परिक्षेत्रात येणारे भाग आहे, म्हणुन पहिले त्यांच्याकडुन काम करून घ्यावे, ते जर करणार नसेल तर अश्या कामाची निकड पाहुन प्रस्ताव सादर करावा.

सभापती :— एन.आय.टी. ज्या मुलभुत सुविधेकरिता नागरिकांकडुन विकास शुल्क वसुल करते, त्या मुलभुत सुविधा कोण—कोणत्या आहेत.

कॅफो :— एन.आय.टी.ने 16 रूपये प्रमाणे नागरिकांकडुन विकास शुल्क वसुल केले आहे, रस्ते,सिव्हर लाईन, पाण्याची पाईप लाईन, स्ट्रॅाम ड्रेन लाईन, मेन होल लाईन, प्रकाश व्यवस्था या कामाची अर्जंसी असेल तर काम करण्यास हरकत नाही.

सभापती :— मुलभुत सुविधा करिता जनतेकडुन एन.आय.टी. जे पैसे घेते त्यामध्ये प्रकाश व्यवस्थेची काय व्यवस्था आहे ?

कार्यकारी अभियंता (विद्युत) :— मा.सभापती महोदय, अश्या लेआउटमध्ये प्रकाश व्यवस्था करण्याकरिता एन.आय.टी.कडे पत्र पाठविले होते, त्याच्यामध्ये त्यांनी जे पैसे घेतले आहे त्याची माहिती लिहुन दिली आहे.

सभापती :— विद्युत विभागाच्या जे.ई.नी गेल्या तीन महिन्यापासुन विद्युत विभागाची फाईल फक्त कॅफो साहेबांनी परिपत्रक काढले त्या कारणासाठी फिरवुन टाकली आहे, त्या पत्रानुसार 572—1900 लेआउटमध्ये काम करता येत नाही. या तीन महिन्यामध्ये डॉलरची किमत 56 ते 70 झाली स्टील 24 हजार टन से 36 हजार टन वर गेले, पोल 3 हजारावरून 6 हजारवर गेलेला आहे. याला जबाबदार कोण आहे, विद्युत विभागाच्या लोकांना माहिती नसल्यामुळे स्थायी समितीनी जे प्रावधान उपलब्ध करून दिलेले आहे, त्या प्रावधानाला कार्यान्वित न करता या सर्क्युलरचा आधार घेवून झोन पासुन तुमच्या कार्यालयापर्यंत तीन महिन्यापासुन फाईल फिरत आहे, काम वेळेवर होत नाही या तीन महिन्यात किती प्राईज वाढल्या आहेत, हे जे लॉस होवुन राहिले आहे याला जबाबदार कोण आहे. आपण याला अज्ञान म्हणुन शकत नाही. कारण सज्ञान माणसाला आपण नोकरी देतो, सज्ञान माणसांनी चुक केली तर ती चुक असु शकत नाही.

कार्यकारी अभियंता (विद्युत) :— मा.सभापती महोदय, 572—1900 लेआउटमध्ये याच्या आधी आम्ही काम केले आहे.

सभापती :— त्या फाईलवर जे.ई.चा रिमार्क आहे, त्यांनी तुम्हाला बरोबर जस्टीफॉय केले नाही, तुमच्या जे.ई.नी फाईल बनवितांना या परिपत्रकाचा आधार घेवुन फाईल बनविली आहे, तुम्ही त्याला अवगत केले नाही.

कार्यकारी अभियंता (विद्युत) :— मा.सभापती महोदय, कुठले प्रस्ताव आल्यानंतर काम होईल यादृष्टीने त्याचा विचार करून त्यांच्याकडुन जस्टीफिकेशन घेण्यांत येईल.

सभापती :— हा जस्टीफिकेशनचा विषय नाही, वॉट अबाउट डिले त्यांना काही माहिती नाही. त्यांनी तुमच्याकडे नोट पुटअप केली, त्यांनी कशी काय नोट पुटअप केली, त्यांना एक्स्पलेशन कॉल करण्यांत यावे किंवा दंड वसुल करण्यांत यावे, यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. याठिकाणी या विषयाच्या संदर्भात चर्चा घडवुन आणण्याच्या मागचे कारण असे आहे कि, अनेक मा.सदस्यांनी प्रकाश व्यवस्थेच्या संदर्भात 572—1900 लेआउटमध्ये काम होत नाही, अश्याप्रकारची तक्रार केली आहे, कॅफो साहेबांच्या सर्क्युलरमुळे त्याठिकाणी काम करता येणार नाही, असे जे.ई.चे मत होते या विषयावर वारंवार चर्चा करून याची अंमलबजावणी होत नव्हती, त्यामुळे कॅफोकडुन माहिती घेवुन विभाग प्रमुखांना सांगण्याचा प्रयत्न केला आहे 572—1900 सॅक्शन लेआउटमध्ये महानगरपालिकेला काम करता येते, ते काम इमरजंसीचे काम आहे ते सर्टीफाय करण्याची जबाबदारी अधिका—यांची आहे, तसेच एन.आय.टी.कडे त्या कामाचा निधी जमा आहे काय ? याची तपासणी करण्याची जबाबादारी सुध्दा संबंधित अधिका—यांची आहे, ते काम महानगरपालिकेनी करावे व एन.आय.टी.कडुन त्याची एन. ओ.सी. घेण्याची जबाबदारी त्या संबंधित अधिका—यांची आहे. आपण त्या सर्क्युलरचा अर्थ अश्या चुकीच्या पध्दतीने काढला आहे, 572—1900 लेआउटमध्ये इमरजंसी काम असेल तर त्याची एन.आय.टी.कडुन एन.ओ.सी. घेवुन त्यासाठी काही निधी उपलब्ध आहे काय याची तपासणी करून घ्यावी जर निधी उपलब्ध नसेल म.न.पा.कडुन ते काम पुर्ण करण्याबाबत नस्ती ताबडतोब सादर करावी.

श्री बंडु तळवेकर :— मा.सभापती महोदय, महानगरपालिकेचे कॉटन मार्केट परिसरात सुलभ शौचालय आहे, त्याठिकाणी दंडात्मक कार्यवाही करण्यांत आली आहे. त्याठिकाणी सहा.आयुक्तांनी नोटीस दिले आहे, त्याठिकाणी चार—चाकी गाडया का पार्क करता म्हणुन गेट बंद केले आहे. त्याठिकाणी एक व्यापारी आपली कार पार्क करतो, त्यांनी त्याच्या दुकानासमोर बांधकाम केले आहे. त्याला सहा.आयुक्त नोटीस का देत नाही.

सहा.आयुक्त (झोन 4) :— मा.सभापती, महानगरपालिकेच्या मार्केटमध्ये जे गेट आहे ते सर्व पहिले ओपन राहत होते, त्याठिकाणी गाडया पार्क करण्यांत येत होत्या, तसेच त्याठिकाणी महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाची गाडी उभी राहत होती. गेटजवळ लोक अतिक्रमण करीत होते म्हणुन सगळयांना नोटीस देवुन गेट बंद करण्यांत आले आहे.

श्री बंडु तळवेकर :— मा.सभापती महोदय, एक दुकानदार त्याठिकाणी गाडी पार्क करतो त्यामुळे लोकांना त्रास होत आहे, त्याठिकाणी शौचालय आहे, ते लेडिज लोकांना बाथरूमला जागा नव्हती त्या शौचालयाचा लॉक लावला आहे, आपले अधिकारी याठिकाणी चुकिची माहिती देत आहे, त्या गेटच्या समोर व्यापा—यांची गाडी उभी राहत आहे. तसेच त्यांनी अर्ध्या भागात बांधकाम सुध्दा केलेले आहे. त्याला सहा.आयुक्तांनी

नोटीस दिलेले नाही, या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची गरज आहे, बाजार समितीचे लोक त्याठिकाणी आले होते, त्यांनी सुध्दा त्याठिकाणची पाहणी केली आहे. याठिकाणी बाजार विभागाच्या अधिक्षकांचे उत्तर घ्यावे.

बाजार अधिक्षक :– मा.सभापती महोदय, त्याठिकाणी आपल्या विभागाची गाडी असते.

सभापती :– मा.सदस्यांनी याठिकाणी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याठिकाणी नोटीस देण्यांत आले आहे, असे त्यांच्या बोलण्यावरून जाणवते, मा.सदस्यांनी जे आरोप केले ते गंभीर स्वरूपाचे असल्यामुळे या विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी संपुर्ण माहिती घेवुन हा अहवाल सात–आठ दिवसात स्थायी समिती पुढे सादर करावा जेणेकरून पुढील कार्यवाही प्रस्तावित करता येईल. त्याचप्रमाणे 15–06–2013 रोजी जलप्रदाय विभागाशी संबंधित धरमपेठ झोनमध्ये पाणी पुरवठयाच्या संदर्भात जास्तीचे बिल पाठविण्यांत आले होते, 50 युनिटपेक्षा जास्तीचे बिल निर्लेखित करण्याबाबत स्थायी समितीच्या वतीने आदेश देण्यांत आले होते तो प्रस्ताव स्थायी समितीपुढे आला नाही, या संदर्भात प्रशासनाच्या वतीने कोणती कार्यवाही करण्यांत आली, त्याचबरोबर आपण आज याठिकाणी आय.आर.डी.पी. रोडच्या संदर्भात आढावा घेवुन या अनुषंगाने किती रूपयांचे प्राकलन तयार झाले आहे, आपण 15 कोटी रूप्यांच्या निधीचा प्रावधान केला होता, त्यापेक्षा जास्त निधी लागणार आहे काय ? याबाबत आपण आढावा घेवु. त्याचबरोबर 152 के तहत पानी के बिल निर्लेखित करने का प्रस्ताव स्थायी समिती के सामने रखने की बात कही गयी थी लेकिन वह विषय स्थायी समिती के पास आज तक नही आया।

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.सभापती महोदय, म.न.पा.मे नया कायद्या लागु होने के बाद महासभे मे यह प्रस्ताव मंजूर होने के बाद मा.आयुक्त ने यह प्रस्ताव शासन के पास 1 फेब्रुवरी को भेजा, मा.आयुक्त का कहना है कि गर्व्हमेंट से मंजूरी मिलने तक इंतजार करो ।

सभापती :– कोणत्या कायद्यानुसार हा प्रस्ताव पाठविण्यांत आला आहे त्याचे निगम सचिव यांनी वाचन करावे.

निगम सचिव :– म.न.पा. अधिनियमातील कलम 152 वाचले.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.सभापती महोदय, याबद्यल आम्ही निगम आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविला होता कि याबद्यल कायद्याचे सल्लागारांचे मत घेवुन पुढे कार्यवाई करता येईल, या प्रस्तावाच्या संदर्भात स्थायी समितीने निर्देश दिले होते त्यानिर्देशाची अंमलबजावणी करण्याकरिता स्थायी समितीच्या प्रोसीडींगची वाट पाहत होतो, या अनुषंगाने माझा पाठपुरावा सुरू होता, मला त्या ठरावाची सत्यप्रत न मिळाल्यामुळे प्रस्ताव पुढे पाठविण्यांत आला नाही, आजची घडामोडी लक्षात घेता हा प्रस्ताव आयुक्तांकडे ठेवतो. महानगरपालिकेच्या जुन्या कायद्यामध्ये निर्लेखन नमुद नव्हता.

सभापती :– 15 तारखेला या अनुषंगाने रूलिंग दिले होते तुमचे म्हणणे आहे कि त्या ठरावाची सत्यप्रत तुम्हाला मिळाली नव्हती, सर्टीफाय कॉपी मिळाल्याशिवाय निगम आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविता येत नाही.

निगम सचिव :– मा.सभापती महोदय, स्थायी समितीचा अहवाल सर्व विभागाला पाठविण्यांत आला आहे, यांना जर त्या ठरावाची सत्यप्रत पाहिजे असेल तर त्यांनी आमच्याकडुन ती सत्यप्रत प्राप्त करून घ्यावी.

सभापती :– या विषयाच्या चर्चेच्या अनुषंगाने पुढच्या स्थायी समितीपुढे तो प्रस्ताव पाठविण्यांत यावा. आयुक्तांना या विषयाच्या अनुषंगाने संभ्रम वाटत असेल तर या संबंधात कायदेशीर अभिमत घ्यावे, या अगोदर आम्ही तेच म्हटले आहे, आमचा इंटरपिटीशन वेगळा वाटत असेल तर तसे सांगावा. जुन महिन्यात दिलेल्या आदेशाचे सप्टेंबरपर्यंत इम्प्लीमेंट होत नसेल तर ही बाब अतिशय गंभीर आहे, याची दखल घ्यावी.

<u>ठराव क्रमांक 124</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर